तहसिलदार संवर्गात पदोन्नतीने
पदस्थापना देणेबाबत...
श्री.संजीवन मुंढे, तहसिलदार

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
शासन आदेश क्र.संकीण-२०२६/प्र.क्र.१९/आस्था-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०६ एप्रिल, २०२६

**संदर्भ:-** १) शासन आदेश, समक्रमांक, दि.२७.०२.२०२६
२) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१

**शासन आदेश:-**

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन आदेशान्वये श्री.संजीवन मुंढे, नायब तहसिलदार गट-ब (वेतनश्रेणी एस-१४ रू. ३८६००-१२२८००) यांना तहसिलदार गट-अ (वेतनश्रेणी एस-१९- रू.५५१००-१७५१००) या संवर्गात सदरहू आदेशातील नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतूदी विचारात घेऊन श्री.संजीवन मुंढे, तहसिलदार यांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे महसूली विभाग वाटप करण्यात येऊन पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | वाटप केलेला महसूल विभाग | पदस्थापनेचे पद |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री. संजीवन मुंढे | पुणे | **तहसिलदार, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर (कडा) या प्रतिनियुक्तीच्या पदावर** |

२. सदर पदोन्नतीचे आदेश तात्काळ अंमलात येत असून श्री. संजीवन मुंढे यांनी पदोन्नतीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे.

३. श्री. संजीवन मुंढे, तहसिलदार यांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटपाबाबतच्या अधिसूचना विचारात घेऊन महसूली विभाग वाटप करण्यात येत आहे.

४. सदर पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित अधिका-यांना शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये.

५. या आदेशान्वये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू न झाल्यास संबंधित अधिका-यांना पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

६. नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार या संवर्गात पदोन्नत झालेल्या उपरोक्त अधिका-यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होऊन कार्यभार स्विकारल्यानंतरच तहसिलदार एस-१९-(रू. ५५१००-१७५१००) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.२०२६०४०६१६३२२९७९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.06 17:25:44 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर, सिंचन भवन, सोलापूर-४१३००३

प्रत,

- मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
- संबंधित जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
- संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
- संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
- संबंधित तहसिलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
- सह सचिव (आस्था-३) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- निवडनस्ती (आस्था-३).